**<u>ठळक बातम्या</u>**

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि सायप्रसचे अध्यक्ष निकोस क्रिस्टो डुली डेस यांच्यात द्विपक्षीय चर्चा, विविध क्षेत्रातलं सहकार्य मजबूत करण्यावर भर
- राज्यात मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरीक्षणाची प्रक्रिया २० जूनपासून ७ ऑक्टोबरपर्यंत चालणार
- राज्यसभेच्या २६ जागांसाठी १८ जूनला मतदान
- राज्यात पेट्रोल आणि डिझेलचा पुरेसा साठा उपलब्ध असल्याची मंत्री छगन भुजबळ यांची माहिती, आवश्यक तितकंच इंधन खरेदी करण्याचं आवाहन

**आणि**

- चंद्रपूर जिल्ह्यात वाघाच्या हल्ल्यात चार महिलांचा मृत्यू

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि सायप्रसचे अध्यक्ष निकोस क्रिस्टो डुली डेस यांच्यात नवी दिल्लीत हैदराबाद हाऊस इथं आज द्विपक्षीय बैठक  झाली. या चर्चेत व्यापार, गुंतवणूक, तंत्रज्ञान, शिक्षण, संस्कृती, स्थलांतर, संरक्षण आणि सुरक्षा, कृत्रिम बुद्धिमत्ता, फिनटेक, नवोन्मेष आणि संशोधन अशा विविध क्षेत्रातलं सहकार्य अधिक मजबूत करण्यावर भर देण्यात आला. तसंच प्रादेशिक आणि जागतिक महत्त्वाच्या मुद्द्यांवरही दोन्ही नेत्यांनी सविस्तर चर्चा झाली. भारत आणि सायप्रस देशांमध्ये असलेले मैत्रीपूर्ण संबंध हे मजबूत असून भविष्यात ते अधिक दृढ होतील, असा विश्वास मोदी यांनी बैठकीनंतर प्रसिद्ध केलेल्या संयुक्त निवेदनात व्यक्त केला आहे. गेल्या दशकात सायप्रसमधून भारतात होणारी गुंतवणूक जवळजवळ दुप्पट झाल्याचंही त्यांनी सांगितलं. भारत-युरोपियन संघात झालेल्या मुक्त व्यापार करारामुळे नव्या संधी निर्माण झाल्या असल्याचं प्रधानमंत्र्यांनी सांगितलं.

**- - होल्ड बाईट मोदी- - -**

गेल्या वर्षभरात भारत-सायप्रस आणि भारत-युरोपियन संघ संबंध अधिक दृढ झाले आहेत असं सायप्रसचे अध्यक्ष निकोस क्रिस्टो डुली डेस यांनी सांगितलं. मोदी यांच्या सायप्रस भेटीनंतर द्विपक्षीय भागीदारीला अधिक चालना मिळाल्याचंही त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

देशभरात सुरू असलेल्या मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरीक्षण प्रक्रियेचा महाराष्ट्रातला कार्यक्रम मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोक्कलिंगम यांनी आज वार्ताहर परिषदेत जाहीर केला. २० जून ते ७ ऑक्टोबर यादरम्यान राज्यातल्या एकंदर ९ कोटी साडे ८६ लाख मतदारांच्या तपशीलाची खातरजमा १ लाखापेक्षा जास्त केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांमार्फत होणार आहे.

२० ते २९ जूनदरम्यान गणना अर्जांची छपाई आणि या अधिकाऱ्यांचं प्रशिक्षण पूर्ण होईल. २००२ ते २००४मध्ये झालेल्या विशेष सखोल पुनरीक्षणातले त्या मतदारांचे तपशील या अर्जांमध्ये असतील. ३० जून ते २९ जुलै या कालावधीत प्रत्येक मतदाराचा गणना अर्ज घेऊन हे अधिकारी मतदारांच्या घरी भेट देतील आणि त्यात भरलेल्या माहितीची शहानिशा करतील. गरज पडली तर निवडणूक आयोगानं ठरवून दिलेल्या ११ कागदपत्रांद्वारे मतदारांची ओळख पटवतील, आणि ही प्रक्रिया पूर्ण करतील. बेपत्ता असलेल्या, स्थलांतर केलेल्या, मृत्यू झालेल्या किंवा दुबार मतदार असलेल्यांची नावं यादीतून गाळली जातील. ५ ऑगस्ट रोजी प्रारूप मतदार याद्या प्रसिद्ध होतील. ५ ऑगस्ट ते ४ सप्टेंबरपर्यंत या याद्यांवर आक्षेप आणि हरकती नोंदवता येतील, ज्या ३ ऑक्टोबरपर्यंत निकाली काढल्या जातील. अंतिम मतदार यादी ७ ऑक्टोबर रोजी प्रसिद्ध केली जाईल. राज्यात ही प्रक्रिया पूर्णपणे पारदर्शक पद्धतीनं राबवली जाईल, विनाकारण कोणाचंही नाव वगळलं जाणार नाही, असं चोक्कलिंगम म्हणाले.

**<><><><>**

राज्यसभेच्या, दहा राज्यांमधल्या २४ जागांसाठीच्या द्वैवार्षिक निवडणुकीचं वेळापत्रक निवडणूक आयोगानं आज जाहीर केलं. ही निवडणूक १८ जूनला होणार असून त्याचदिवशी मतमोजणी होणार आहे. १ जून रोजी निवडणुकीसाठीची अधिसूचना जारी केली जाईल, असं निवडणूक आयोगानं सांगितलं. याशिवाय राज्यसभेच्या दोन जागांसाठीची पोटनिवडणूकही निवडणूक आयोगाने आज जाहीर केली. महाराष्ट्राच्या उप मुख्यमंत्री सुनेत्रा पवार आणि अण्णा द्रमुकचे नेते सी. व्ही. षण्मुगम हे विधानसभेवर निवडून गेल्यामुळे या दोन जागा रिक्त झाल्या आहेत. पोटनिवडणुकीसाठीही १८ जूनलाच मतदान होणार आहे.

**<><><><>**

आंतरराष्ट्रीय स्तरावर निर्माण झालेल्या परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर, इंधन टंचाई निर्माण होण्याच्या अफवा पसरवल्या जात असून, राज्यात पेट्रोल, डिझेलचा पुरेसा साठा उपलब्ध असल्याची माहिती अन्न आणि नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनी दिली आहे. ते आज मुंबईत वार्ताहरांशी बोलत होते. नागरिकांनी भीतीपोटी अतिरिक्त पेट्रोल-डिझेल खरेदी करून साठवणूक करू नये, गेल्या काही दिवसांत अनेक ठिकाणी गरजेपेक्षा अधिक इंधन खरेदी केल्यानं मे महिन्यात नेहमीच्या तुलनेत पेट्रोल-डिझेलची सुमारे २० टक्के अधिक विक्री झाल्याचं त्यांनी सांगितलं. नागरिकांनी संयम बाळगून आवश्यकतेनुसारच इंधन खरेदी करावी आणि प्रशासनाला सहकार्य करावं, असं आवाहन देखील भुजबळ यांनी केलं.

**<><><><>**

चंद्रपूर इथं तेंदूपत्ता गोळा करणाऱ्या चार महिलांचा वाघाच्या हल्ल्यात मृत्यू झाल्याची माहिती वन अधिकाऱ्यानं दिली आहे. सिंदेवाही तालुक्यातल्या गुंजेवाही गावातल्या या महिला आज पहाटे तेंदूपत्ता गोळा करण्यासाठी गेल्या होत्या,

त्यावेळी वाघानं त्यांच्यावर हल्ला केला, यात त्यांचा मृत्यू झाला. कविता मोहुर्ले, अनिता मोहुर्ले, सुनिता मोहुर्ले आणि संगीता चौधरी अशी त्यांची नावं आहेत. हल्लेखोर वाघाचा माग काढण्यासाठी वन विभागानं विशेष पथक नियुक्त केलं असून परिसरात गस्त वाढवली आहे. नागरिकांनी पुढचे काही दिवस जंगल परिसरात एकट्यानं जाऊ नये, असं आवाहन वन विभागानं केलं आहे.

<><><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या सकाळी दूरदृश्य प्रणालीच्या माध्यमातून विविध सरकारी विभागांमध्ये नियुक्त करण्यात आलेल्या ५१ हजार युवकांना नियुक्ती-पत्र प्रदान करणार आहेत. यावेळी मोदी त्यांना संबोधितही करणार आहेत. हा १९ वा रोजगार मेळा देशभरातल्या ४७ ठिकाणी आयोजित केला जाणार आहे. प्रधानमंत्र्यांची नवीन रोजगार निर्मितीला प्राधान्य देण्याची वचनबद्धता या रोजगार मेळ्याच्या माध्यमातून प्रत्यक्षात साकार होणार आहे.

गेल्या १८ रोजगार मेळाव्यांच्या माध्यमातून आत्तापर्यंत सुमारे १२ लाख युवकांना विविध सरकारी विभागांत नियुक्त करण्यात आलं आहे.

<><><><><>

नीट पेपरफुटी प्रकरणात आज लातुरातल्या आणखी दोन डॉक्टरांची सीबीआयनं चौकशी केली. या दोघांनी आपल्या पाल्यांसाठी पी. व्ही. कुलकर्णी याच्याकडून प्रश्नपत्रिका खरेदी केल्याचा त्यांच्यावर संशय आहे. या प्रकरणात आणखी काही पालक, विद्यार्थी आणि मध्यस्थांची नावं समोर येणार असल्याचं सांगितलं जात असून, लातूरसह राज्यात विविध ठिकाणी सीबीआयचा तपास वेगाने सुरू आहे.

<><><><><>

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज सनरायर्जस हैदराबाद आणि रॉयल चँलेजर्स बंगळुरु याच्यात सामना होणार आहे. हैदराबाद इथं थोड्याच वेळात, साडेसात वाजता हा सामना सुरु होईल.

सनरायर्जस हैदराबादनं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करायचा निर्णय घेतला आहे.

**<><><><><>**

राज्यात काही ठिकाणी आज पावसाने हजेरी लावली.

पुणे शहर आणि परिसरात आज दुपारनंतर ढगांचा गडगडाट आणि सोसाट्याच्या वाऱ्यासह जोरदार पाऊस पडला. गेले काही दिवस उन्हाच्या काहिलीने हैराण झालेल्या पुणेकरांना त्यामुळे, उकाड्यापासून काहीसा दिलासा मिळाला. पावसामुळे अनेक ठिकाणी पाणी साठल्यामुळे वाहतूक विस्कळीत झाली.

**सातारा** जिल्ह्यात खंडाळा, सातारा आणि वाई तालुक्यात विविध भागात मेघगर्जनेसह मुसळधार पाऊस झाला. तर नागठाणे परिसरात वीज पडून एका मेंढपाळाचा मृत्यू झाला.

दरम्यान, आगामी मान्सूनच्या पार्श्वभूमीवर संभाव्य नैसर्गिक आपत्तीचा सामना करण्यासाठी नांदेड महानगरपालिका आयुक्त डॉक्टर महेशकुमार डोईफोडे यांच्या अध्यक्षतेखाली शहरी आपत्ती व्यवस्थापन समितीची विशेष आढावा बैठक काल झाली.

**<><><><><>**

गेल्या २४ तासात कोकण आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी पाऊस पडला. विदर्भात तुरळक ठिकाणी कमाल तापमानात उल्लेखनीय वाढ झाली. राज्यात सर्वात जास्त कमाल तापमान ब्रह्मपुरी इथं ४७ पूर्णांक १ दशांश अंश सेल्सिअस नोंदवलं गेलं.

येत्या दोन दिवसात कोकण, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी विजांचा कडकडाट आणि मेघगर्जनेसह सोसाट्याचा वारा वाहून पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे. विदर्भात तुरळक ठिकाणी उष्णतेची तीव्र लाट येण्याची शक्यता आहे.

**//<><><><><>//**